म्हाडा
MHADA

**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**

गृहनिर्माण भवन, रुम नं.५६५, ४था माळा वांद्रे-पूर्व, मुंबई-४०० ०५१.

जा.क्र.मि.व्य./डब्ल्यू/मुं.मं./ 1861 /२२ दि. 10 JUN 2022

**प्रति,**
सचिव,
**गोराई (१) शिवशक्ती** सह.गृह.संस्था (मर्या.),
भूखंड क्र.**५४,** आर.एस.सी.**१८,**
**गोराई बोरीवली (प.),**
मुंबई -**४०० ०९१.**

विषय :- **गोराई बोरीवली (प.),** येथील भूखंड संकुल क्र.**५४,** आर.एस.सी.**१८,** मधील घरकुल क्र.**सी-२८** चे **ना- देय प्रमाणपत्र** देणेबाबत.

संदर्भ :- १. **श्री.योगेश विश्वनाथ शेलार** यांचा दिनांक **३०.०५.२०२२** रोजीचा अर्ज.
२. या कार्यालयाचे पैसे भरण्याचे चलन क्रमांक **४००३२२२३०००००२६३** दि.**०९.०६.२०२२.**
३. **शिवशक्ती** सह.गृह.संस्था (मर्या), **गोराई बोरीवली (प.)** यांचे दि.**०८.०६.२०२२** चे ना-हरकत पत्र.

**महोदय,**

संदर्भाधिन क्र.१ ला अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, प्राधिकरणाने दि.०६.०५.२०१० चा ठराव क्र.६४८० अन्वये " म्हाडा आणि नोंदणीकृत सह.गृह.संस्था, यामध्ये भाडेपट्टा करारनामा करुन, वितरीत केलेल्या भूखंडावरील सह.गृह.संस्थेतील सभासदत्व बदल सह.गृह.संस्थेच्या अधिनियमातील तरतूदीनुसार सह.गृह.संस्थेने संबंधित सभासदाचे विहित पुरावे घेऊन, हस्तांतरण / नियमितीकरणाबाबत संस्था स्तरावर कार्यवाही करावी " असा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. तथापि, म्हाड विनियमातील कलम २५(२) हे आपल्या संस्थेला बंधनकारक राहील हयाची नोंद घ्यावी. म्हाडा आणि **गोराई (१) शिवशक्ती** सह.गृह.संस्था (मर्या.), यामध्ये **गोराई बोरीवली (प.)** येथील भूखंड संकुल **५४** बाबत माहे **एप्रिल-१९८९** मध्ये भाडेपट्टा करारनामा करण्यात आलेला आहे.

सदर भूखंड संकुलातील, भूखंडाच्या विक्री किमंतीचे १० टक्के रक्कम वसूल करुन, ९० टक्के रक्कम मासिक सम हप्त्याने २० वर्षांचे कालावधित भरावयाची आहे. **एप्रिल-१९८९** मधील भाडेपट्टा करारनामाच्या अटी व शर्तीनुसार, सदर मासिक हप्ता तथा उर्वरीत रक्कम भरणे, सह.गृह.संस्थेवर बंधनकारक आहे. तसेच भूखंडाच्या लाभार्थीना देण्यात आलेल्या घर बांधकाम कर्जाचा मासिक हप्ता तथा कर्जाची उर्वरीत रक्कमेचा भरणा करणे, सह.गृह.संस्थेवर बंधनकारक आहे. तसेच संस्थेसोबत झालेल्या भाडेपट्टा करारनाम्यानुसार अनुज्ञेय चटईक्षेत्र व सक्षम यंत्रणेकडून मंजूर नकाशानुसारच बांधकाम करणे बंधनकारक असेल. अन्यथा संस्था व आपणांविरुध्द महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ अन्वये कार्यवाही करण्यात येईल.

या कार्यालयाचे संदर्भ क्र.२ नुसार कळविण्यात आलेल्या **गोराई बोरीवली (प.)** येथील भूखंड संकुल क्र. **५४** मधील घरकुल क्र.**सी-२८** चे उर्वरीत रक्कमेचा भुईभाडे माहे **जानेवारी-२०२३** पर्यंत भरणा केला आहे. **तसेच अकृषी कर वसुलीचा निर्णय शासन स्तरावर प्रलंबित असून भविष्यात शासनाचा जो काही निर्णय होईल तो आपणांस व संस्थेस बंधनकारक राहील. तथापि भविष्यात काही थकबाकी निघाल्यास फरकाची रक्कम आपणांस भरणे बंधनकारक राहील.** सह.गृह.संस्थेच्या अधिनियमातील / उपविधीतील तरतुदीनुसार संस्थेच्या स्तरावर कायदेशीर वारसाच्या नावे हस्तांतरणाबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करावी. सादर केलेल्या कागदपत्रांच्या अधिन राहून सदरचे ना-देय प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. भविष्यात सदर घरकुलाच्या मालकी हक्काबाबत काही कायदेशीर वाद उद्भवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी आपल्या सह.गृह.संस्थेची राहिल. तसेच सादर केलेली कागदपत्रे/दस्तऐवज खोटी अथवा बनावट आढळल्यास या कार्यालयाकडून देण्यात आलेले ना-देय प्रमाणपत्र पूर्वलक्षी प्रभावाने रद्द समजण्यात येईल.

आपला विश्वासू,

मिळकत व्यवस्थापक (डब्ल्यू),
मुंबई मंडळ.

पत्राची प्रत : **श्री.योगेश विश्वनाथ शेलार, गोराई (१) शिवशक्ती** सह.गृह.संस्था (मर्या.), भूखंड संकुल क्रमांक **५४,** घरकुल क्र.**सी-२८, गोराई बोरीवली (प.),** मुंबई-**४०० ०९१** यांना माहितीसाठी रवाना.